
अखंड महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक
बीड
# लोकनेता
Lokneta News - लोकनेता न्युज
● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे
Epaper: www.dainiklokneta.in/
दैनिक लोकनेता
दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.
मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112
dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

गुरुवार दि.२३ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २४९ किंमत २ रुपये 7499615933

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा निधी मिळेना

## १७७ मृत शेतकऱ्यांच्या वारसांना अनुदानाची प्रतीक्षा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ.संभाजीनगर । डॉ.ज्ञानदेव चेपटे**

दि.२२ एप्रिल:जिल्ह्यात घात,अपघात शेतकरी मृत्यूमुखी पडला अथवा त्यास अपंगत्व आल्यास शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत शेतकऱ्याच्या वारसदाराला २ लाख रुपये अनुदान देण्यात येते,मात्र मागील वर्षापासून अर्ज केलेल्या जिल्ह्यातील १७७ मृत शेतकऱ्यांसाठी शासनाने अद्याप निधीच दिलेला नाही.मार्च अखेरपर्यंत या योजनेसाठी केवळ ७४ लाख रुपये शासनाने दिले.घरातील कमवत्या पुरुषाचे निधन झाल्यास त्याच्या परिवारावर उपासमारीची वेळ येऊ शकते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने शेतकऱ्यांसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना आणली.

योजनेअंतर्गत घात,अपघात अथवा नैसर्गिकरित्या शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास अथवा त्यास अपंगत्व आल्यास शासनाकडून त्यांना २ लाख रुपये अनुदान देण्यात येते.

मात्र मागील दोन वर्षापासून मागणीनंतर ही निधीच मिळत नाही. जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय वतीने जिल्ह्यातील २१२ मृत शेतकऱ्यांच्या वारसासाठी आणि अपंगत्व आलेल्या २ अशा एकूण २१४ जणांसाठी ४ कोटी २४ लाख रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली होती.

मार्च अखेरपर्यंत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठी केवळ ७४ लाख रुपये शासनाने जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयास दिले.हा निधी ३७ जणांना वाटप करण्यात आला.उर्वरित जे १७७ मृत शेतकऱ्यांची वारसदार अजून प्रतीक्षेत आहेत.या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.

कोटी जणांसाठी २४ लाख रुपयांच्या निधीची मागणी.

**६५ प्रस्ताव अडकले कागदपत्राच्या त्रुटीत**

१.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर एक महिन्याच्या आत सानुग्रह अनुदान मिळवण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे. मात्र काही कारणास्तव शेतकरी अर्ज करू शकले नाही.

२.अशा ६५ मृत शेतकऱ्यांच्या वारसदारांनी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयास ऑफलाइन पद्धतीने प्रस्ताव दाखल केले.या प्रस्तावात अनेक त्रुटीत आढळल्याने संबंधितांना कागदपत्राची पूर्तता करण्याचे सांगण्यात आले आहे. हे प्रस्ताव परिपूर्ण झाल्यानंतर शासनाकडे निधीची स्वतंत्र मागणी करण्यात येणार आहे.



# मागण्या मान्य करा अन्यथा २७ एप्रिलपासून बेमुदत बंद! कृषी विक्रेत्यांचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धडक दिली आहे. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद आंदोलन छेडण्याचा इशारा देत तहसीलदार व आमदारांना निवेदन सादर करण्यात आले. अहिल्यानगर फर्टीलायझर चे जिल्हाध्यक्ष

जिल्हाध्यक्ष मा. सतीश शेठ मुनोत, तालुकाध्यक्ष दिलीप शेठ रोकडे, उद्योजक राहुल शेठ कारखिले, उद्योजक महादेव शेठ दराडे, राहुल शेठ दरंदले, जवाहरलाल मंडलेचा, नितीन शिरसाट आदींसह तालुक्यातील सर्व कृषी विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मा. तहसीलदार उद्धव नाईक साहेब , कृषी अधिकारी लोंढे साहेब यांना निवेदन देऊन विक्रेत्यांनी आपल्या प्रमुख मागण्या




मांडल्या. यामध्ये परवाना नूतनीकरण प्रक्रिया सुलभ करणे, ऑनलाईन पोर्टलमधील तांत्रिक अडचणी दूर करणे, खत-बियाणे व कीटकनाशक विक्रीवरील निर्बंध शिथिल करणे, बनावट व निकृष्ट दर्जाच्या औषधांवर कठोर कारवाई करणे, विक्रेत्यांकडून घेतलेली अनामत रक्कम परत करणे, तसेच तपासणी अधिकाऱ्यांची संख्या वाढवणे आदी मागण्यांचा समावेश आहे.तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर युरिया व डीएपी खतांचे नियोजनबद्ध वितरण करावे, थेट कंपन्यांकडून होणाऱ्या विक्रीमुळे स्थानिक विक्रेत्यांचे नुकसान थांबवावे, अशाही ठोस मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

याचवेळी कृषी अधिकारी तसेच मा. आमदार मोनिकाताई राजळे यांनाही संपाबाबत व मागण्यांबाबत निवेदन सादर करण्यात आले. शासनाने आठ दिवसांत सकारात्मक निर्णय न घेतल्यास तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे २७, एप्रिलपासून बेमुदत बंद ठेवण्यात येतील, असा इशारा देण्यात आला आहे.या आंदोलनामुळे शेती हंगामाच्या तोंडावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून प्रशासनाने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी विक्रेत्यांकडून करण्यात येत आहे.

# कोणसई फटाका कारखान्यात भीषण स्फोट प्रकरणी चौघांना अटक

## दुर्घटनेत दोघांचा मृत्यू, १० हून अधिक जण जखमी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर । श्री तुषार भोईर**

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील कोणसई येथे फटाके बनवणाऱ्या कारखान्यात भीषण स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडली. या स्फोटात दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. या प्रकरणी वाडा पोलिसांनी कारखान्याशी संबंधित चौघांना अटक केली आहे.या गंभीर प्रकरणी वाडा पोलिसांनी कंपनीचा मालक नरेंद्र सिंग, त्याचा साथीदार श्रीपद यादव, सुपरवायझर योगेश मोकाशी आणि जमिनीचा मालक वसंत नाईक या चौघांना मध्यरात्री अटक केली आहे. पुढील तपास पोलीस करत असून या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

या दुर्घटनेत मृतांमध्ये भावेश दिलीप




वावरे (वय २५, रा. जामघर) आणि मोनिका सचिन पडवळे (वय अंदाजे ३०, रा. पालसई) यांचा समावेश आहे. तर मोनिका मोहन वारदी (वय २५), जागृती जगदीश गवते (वय २७, रा. जामघर), प्रतिभा प्रताप पवार (वय ३०, रा. कोणसई) आणि मोनिका महेंद्र जाधव (वय २५) हे जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

सदर कारखान्यात सुमारे ३५ कामगार काम करत असल्याचे समोर आले आहे. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्थानिकांच्या माहितीनुसार, या ठिकाणी सुतळी बॉम्बसह विविध प्रकारचे फटाके तयार केले जात होते.प्राथमिक तपासात हा कारखाना अनधिकृतपणे सुरू असल्याचे उघड झाले आहे. सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या मागणीमुळे वाडा तालुक्यात अशा बेकायदेशीर फटाका कारखान्यांची संख्या वाढत असल्याची बाब समोर येत आहे.या दुर्घटनेमुळे पुन्हा एकदा बेकायदेशीर फटाका कारखान्यांचा मुद्दा ऐरणीवर आला असून प्रशासनाने अशा कारखान्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नांदेड ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

## तेलंगणातून येणारा १३.४०लाखांचा गांजा जप्त, १७ जणांविरुद्ध गुन्हा




लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

नांदेड ग्रामीण पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान मोठी कारवाई करत तेलंगणा राज्यातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा गांजा पकडला असून या प्रकरणात १७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सुमारे १३ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस उप अधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत जिल्ह्यात अवैध धंदे, गुन्हेगारी आणि अंतरराज्य तस्करी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलिसांकडून चंदासिंग कॉर्नर परिसरात नाकाबंदी करण्यात आली होती.

नाकाबंदी दरम्यान देगलूरकडून नांदेडकडे येणारी मारुती कंपनीची डिझायर कार संशयास्पदरीत्या वेगाने येताना दिसली. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा इशारा दिल्यानंतर चालकाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून वाहन अडवले.

वाहनाची झडती घेतली असता कारच्या डिकीत पांढऱ्या रंगाच्या पिशवीमध्ये चिकट टेपने गुंडाळलेले बॉक्स आढळून आले. या बॉक्समध्ये हिरव्या रंगाचा पाला व काड्या असलेला गांजा सापडला. तपासात हा गांजा तेलंगणा राज्यातील बोधन परिसरातून आणण्यात आल्याचे समोर आले.

या प्रकरणातील मुख्य आरोपी अकबर अहमद खान पठाण याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून चौकशीतून इतर साथीदारांची नावे समोर आली. त्यात माधव विठ्ठल जाधव, अतुल कवडे, बालाजी कांबळे, शंकर ओमार, संतोष कारणेवाड, शेख शफी, शेख सादिक, मोहमद इसाक मोहमद युसूफ, मोहमद हमीद, लंगड तशू, नवाब, रौफ, संघर्ष पावले आणि २ अनोळखी अश्या एकूण १७ आरोपींविरुद्ध गुंगीकारक औषधे व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत गुन्हा क्रमांक ४३३/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान गांजासह वापरलेली कार असा एकूण १३.४० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या कारवाईत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले, बापूराव चव्हाण, ज्ञानेश्वर मठवाड पोलीस अंमलदार समीर अहेमद, वसंत केंद्रे, कल्याणकर, शंकर माळगे, पवार, सिरमलवर, देवकत्ते आणि अनेक होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

नांदेड जिल्ह्यातून होत असलेली अंतरराज्य अमली पदार्थ तस्करी रोखण्यासाठी पोलिसांकडून पुढील काळातही विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे. या कारवाईमुळे अमली पदार्थ तस्करांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांच्या सतर्कतेचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# जाऊवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

## भाविकांसाठी ह.भ.प. सदगुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्री भजनाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

निलंगा तालुक्यातील जाऊवाडी येथे गेल्या अठरा वर्षापासुन अविरत अखंडपणे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा साजरा केला जातो. जाऊवाडी येथे सर्वधर्म समभाव जपत गेल्या अठरा वर्षापासुन सदगुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थानचे ज्ञानेश्वर महाराज औसा यांच्या कृपा आशीर्वादाने व सदगुरु गुरुबाबा महाराज औसेकर व सदगुरु गहिनीनाथ महाराजांच्या प्रेरणेने जाऊवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो.



या सप्ताहात काकडा, गुरुगीता , ज्ञानेश्वरी पारायण , मल्लनाथ गाथा भजन , विरनाथ चरित्र, हरिपाठ ,राम कृष्ण हरी भजन ,चक्रीभजन ,कीर्तन संगीत भजन, हरिजागर अशा अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी सरपंच कमलाकर व्हरगळे ,ह.भ.प हरिभाउ व्हरगळे ,ह.भ.प नवनाथ महाराज व्हरगळे ,ह.भ.प माधव महाराज पवार ,दत्ताडोरले , शाम भंडे, नागनाथ दोड्डे , सुनिल रक्टे, वसंत व्हरगळे ,राम व्हरगळे ,मुकींद व्हरगळे ,अतुल व्हरगळे, बब्रुवान जमादार , अतुल व्हरगळे , बालाजी शिंदे , सुभाष व्हरगळे, चेअरमन माधव डोरले, ओम व्हरगळे, त्र्यंबक रक्टे , बाबुराव सुरवसे, पंडीत डोरले , ईश्वर डोरले , संतोष डोरले , श्रीरंग डोरले ,नागनाथ डोरले ,नागनाथ रक्टे ,लखन डोरले,गोरख डोरले ,रावसाहेब व्हरगळे , लिंबाजी व्हरगळे , अरविंद व्हरगळे ,दयानंद व्हरगळे ,अनिल डोरले , विनंताबाई व्हरगळे ,लक्ष्मीबाइ डोरले ,कडाबाई व्हरगळे , मिराताइ व्हरगळे , वर्षा व्हरगळे , कोमल डोरले ,कोमल व्हरगळे सह जाउवाडी ग्रामस्थ उपस्थीत होते.

# हिरापूर ग्रामपंचायतीत अनुसूचित जातींच्या हक्कांवर गदा? रद्द झालेली आरक्षित जागा पुन्हा भरण्याची जोरदार मागणी!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । पवन देरकर**

आदिवासी बहुल कोरपना तालुक्यातील हिरापूर (सांगोडा) ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती पुरुष सदस्यासाठी असलेली आरक्षित जागा रद्द करण्यात आल्याने संताप व्यक्त होत असून, ती जागा पुन्हा भरण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत येथील तथागत बुद्ध विहार युवा मंडळाच्या वतीने उपविभागीय अधिकारी, राजुरा यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायत हिरापूर येथे एकूण ७ सदस्यांपैकी वार्ड क्रमांक ३ मध्ये सन २०१५ पूर्वी अनुसूचित जाती पुरुषासाठी एक जागा तसेच सर्वसाधारण स्त्रीसाठी



एक जागा आरक्षित होती. मात्र सन २०१५ व २०२० या दोन्ही पंचवार्षिक ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये अनुसूचित जातीसाठी असलेली आरक्षित जागा रद्द करण्यात आल्याने या समाजाचे प्रतिनिधित्व पूर्णपणे कमी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत क्षेत्रात अनुसूचित जातीची लोकसंख्या सुमारे २५ टक्के असतानाही त्यांना प्रतिनिधित्वापासून वंचित ठेवण्यात आल्याने सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला धक्का बसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन रद्द करण्यात आलेली अनुसूचित जाती पुरुष सदस्याची आरक्षित जागा पुन्हा नियमित करावी आणि संबंधित समाजाला प्रतिनिधित्वाची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ही मागणी तथागत बुद्ध विहार युवा मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी निवेदनाद्वारे केली असून, याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# परळीतील सांची बौद्ध विहारात भव्य दिव्य भीमगीतांचा सांस्कृतिक महासोहळा

## युवा नेते सचिनभाऊ कागदे यांच्या पुढाकारातून जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम

### नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड विजय रोडे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त परळी शहर 'जय भीम'च्या जयघोषाने दुमदुमणार आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिनभाऊ कागदे यांच्या पुढाकारातून शिवाजीनगर येथील सांची बौद्ध विहार, थर्मल रोड येथे भव्य दिव्य भीमगीतांचा सांस्कृतिक महासोहळा आयोजित करण्यात आला असून, गुरुवार दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात रंगणार आहे.

या सोहळ्यात 'काळजावर कोरले नाव' फेम अजय देहाडे यांच्यासह चेतनकुमार चोपडे, सचिन भुईगळ, विजयजी पवार, विकास साळवे यांसारखे नामवंत गायक आपल्या दमदार आवाजातून भीमगीत व बुद्धगीत सादर करणार आहेत. त्यांच्या सुरेल सादरीकरणातून बाबासाहेबांच्या विचारांचा, संघर्षाचा आणि सामाजिक क्रांतीचा संदेश रसिकांच्या मनात खोलवर रुजणार आहे.

समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची ज्योत अधिक तेजस्वी व्हावी, तसेच युवा पिढीने गीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार आत्मसात करावेत, या उदात्त हेतूने सचिनभाऊ कागदे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. भीमगीतांच्या स्वरातून उपस्थितांना प्रेरणा, अभिमान आणि सामाजिक जाणीवेचा जागर अनुभवायला मिळणार आहे.

या सांस्कृतिक सोहळ्यात बाबासाहेबांच्या जीवनप्रवासावर आधारित विविध प्रेरणादायी गीते सादर होणार असून, वातावरण भारावून टाकणाऱ्या या कार्यक्रमाबद्दल शहरात विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे.या कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक सचिनभाऊ कागदे यांच्यासह शरण मस्के (रिपाई ता. अध्यक्ष), कार्तिक कांबळे (नगरसेवक), भीमराव पोळे, यशपाल मुंडे, रवी मुळे, बापू गायकवाड, बाबा सरोदे, संदीप मस्के, नट्टू शिंदे, अतिष अदोडे, प्रदीप भोकरे, कैलास तरकसे, नितीन धाटे, महादू गवारे, सनी देवडे, राम मुंडे, महेश आदमाने, अजय ढगे, कुमार डेंगळे व समस्त भीमसैनिक परळी यांनी केले आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही परळीत आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम होत असले, तरी हा भीमगीतांचा महासोहळा विशेष आकर्षण ठरणार असून, सांची बौद्ध विहार परिसर 'जय भीम'च्या घोषणांनी दुमदुमणार, अशी भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

# महिलांच्या एकजुटीचा विजय! वाड्यात 'हंडा मोर्चा'नंतर पाणीपुरवठा कामांना सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर । श्री तुषार भोईर**

वाडा तालुक्यातील ५४ गावांतील तब्बल ८० पाड्यांमध्ये निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. महिलांना दररोज लांब अंतर चालत जाऊन पाणी आणावे लागत होते, तर अनेक ठिकाणी दूषित पाण्यावरच अवलंबून राहावे लागत होते. या गंभीर परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती कार्यालयासमोर हंडा मोर्चा आंदोलन छेडण्यात आले. पाणी मिळेपर्यंत माघार नाही या ठाम भूमिकेसह महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत ठिय्या आंदोलन सुरू केले. पहिल्या दिवसापासूनच महिलांनी डोक्यावर हंडे घेऊन प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.




आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी महिलांचा संताप आणखी तीव्र झाला. आम्हाला आश्वासन नको, पाणी हवे अशा स्पष्ट शब्दांत प्रशासनाला जाब विचारण्यात आला. महिलांनी आंदोलनस्थळी रात्रभर ठाण मांडून चुली पेटवत आपला लढा अधिक तीव्र केला. या एकजुटीमुळे प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला.

वाढत्या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाने शिष्टमंडळासोबत चर्चा केली आणि केवळ लेखी आश्वासन न देता तातडीने पाणीपुरवठा सुधारण्यासाठी प्रत्यक्ष कामांना सुरुवात केली. तसेच, पुढील काळात पाणीटंचाई दूर करण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

या ठोस पावलांनंतर श्रमजीवी संघटनेच्या वतीने आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. हा केवळ पाण्याचा नव्हे, तर आमच्या जगण्याचा प्रश्न आहे. प्रशासनाने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्यामुळे महिलांच्या लढ्याला खरे यश मिळाले, अशी प्रतिक्रिया संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. तसेच, ठरलेल्या कृती कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी झाली नाही तर पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात जिल्हा महिला ठिणगी प्रमुख रेखा पऱ्हाड, तालुका अध्यक्ष भरत जाधव, तालुका सचिव सुरज दळवी, तालुका उपाध्यक्ष आदेश वाघ, सुजाता पारधी, देवेंद्र वाघ, बाळू लहांगे, तालुका महिला ठिणगी प्रमुख सुगंधा विघ्ने यांच्यासह इतर पदाधिकारी व मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या..

# दैनिक लोकनेता परिवाराचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

दैनिक लोकनेता च्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दैनिक लोकनेता राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळाचे आयोजन परळी येथे करण्यात आले आहे.

यामध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार (शैक्षणिक क्षेत्र),उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार- (पत्रकारिता क्षेत्र) लोकनेता पुरस्कार-(राजकीय क्षेत्र) क्रीडारत्न पुरस्कार- (क्रीडा क्षेत्र) आदर्श समाजसेवक -(सामिजिक क्षेत्र)आदर्श सरपंच -(सरपंच व ग्रामपंचायत) नारी शक्ती सन्मान (महिलांसाठी) महाराष्ट्र लोकभूषण पुरस्कार -(उद्योजक व इतर क्षेत्र) कृषीरत्न पुरस्कार- शेतकऱ्यांसाठी) आरोग्यदूत पुरस्कार -(वैद्यकीय क्षेत्र डॉ/नर्सेस)उद्योगरत्न पुरस्कार (उद्योजकांसाठी)साहित्यरत्न पुरस्कार -(साहित्यिक/लेखक/कवी)उत्कृष्ट कलाकार -(कला व अभिनय क्षेत्र) आदी क्षेत्रांतील मान्यवरांना गौरविण्यात येणार आहे.यामध्ये विनोद वामनराव जोगदंड-महाराष्ट्र लोकभूषण पुरस्कार भूम ,नारायण सोपन साळुंखे-आदर्श समाजसेवक/तेर धाराशिव ,अँड माणिक बन्सी आदमाने आदर्श समाजसेवक/अंबेजोगाई,संजय देवीदास घोगरे लोकनेता पुरस्कार/कळंब,संजय महारूद्र क्षीरसागर आदर्श शिक्षक/ घाटपिंपरी भूम,दत्तात्रय मोहनराव तांबे कृषिरत्न पुरस्कार/चिंचपुर ढगे भूम,तुषार सिध्देश्वर शिंदे लोकनेता पुरस्कार/ कळंब,नाना सर्जेराव मदने आदर्श समाजसेवक पुरस्कार मु पो सोनगिरी ता भूम,रविकिरण भास्कर भोजने मु पो हाडोंग्री ता भूम आदर्श शिक्षक पुरस्कार,दिलीप दगडू भालेराव आदर्श शिक्षक जि.प.कें. प्रा.शा.हाळम ता.परळी आदींची निवड करण्यात आली आहे.या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

# मांडवी येथे क्रीडा आणि वाचनालय संस्कृतीचा वारसा जपला मा.श्री.प्रफुल्लजी राठोड यांच्या पुढाकाराने सेवालाल वाचनालयाचे रूप पलटले

## युवकांच्या मागणीला यश ५० वर्षांची व्हॉली बॉल परंपरा आणि वाचन संस्कृतीला मिळाली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । प्रतिनिधी**

मांडवी येथील लोकप्रतिनिधीं आणि जागरूक युवकांची साथ लाभली की गावाचा कायापालट कसा होतो, याचे आदर्श उदाहरण किनवट तालुक्यातील मांडवी येथे दिसत आहे. माजी महसूलमंत्री स्व. उत्तमराव राठोड यांनी सुरू केलेली ५० वर्षांची क्रीडा परंपरा आणि स्व. बळीरामजी पाटील यांनी पेरलेली वाचन संस्कृतीची बीजं आता अधिक जोमाने बहरत आहेत. याच परंपरेचा कणा असलेल्या सेवालाल उद्यानातील वाचनालयाचे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्लजी राठोड यांच्या विशेष पुढाकारानेनूतनीकरण करण्यात आले असून, या वाचनालयाने आता आधुनिक रूप धारण केले आहे.मांडवी गावाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. माजी महसूल राज्यमंत्री तथा हिंगोलीचे माजी खासदार स्व. उत्तमराव राठोड यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली ५० वर्षांची व्हॉलीबॉल स्पधेर्ची परंपरा आजही अखंड सुरू आहे. केवळ खेळच नव्हे, तर बौद्धिक वारसा जपणारे हे गाव आहे. १९३६ मध्ये स्व. बळीरामजी पाटील यांनी 'हिरा वाचनालया'ची स्थापना करून गावात ज्ञानाची गंगा आणली होती. याच परंपरेचा पुढचा भाग म्हणून सेवालाल उद्यानातवाचनालय सुरू करण्यात आले होते. मात्र, काळाच्या ओघात या वाचनालयाची अवस्था विकटझाली होती. पडझड झालेल्या भिंती आणि सोयीसुविधांचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांना तिथे बसूनअभ्यास करणे अशक्य झाले होते. ही बाब गावातील तरुण कार्यकर्ते अंकुश ठाकूर, रत्नम श्रीमनवार,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि थोर समासुधारक महात्मा फुलेंनी दिलेला ज्ञानाचा वारसा जपण्यासाठीच आम्ही या



वाचनालयाला नवसंजीवनी दिली आहे. मांडवीची क्रीडा आणि वाचन संस्कृती हीच आमची खरी श्रीमंती आहे. येथील युवकांनी अभ्यासाकडे वळून स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे....?

प्रफुल्लजी राठोड (माजी सदस्य, जिल्हा परिषद, मांडवी)

आयुष डोंगरे व नमन सिडाम यांनी प्रफुल्लजी राठोड यांच्या निदर्शनास आणून दिली, युवकांच्या भावनेची तात्काळ दखल घेत प्रफुल्लजी राठोड यांनी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून या वाचनालयाचा पूर्णतः कायापालट केला आहे. मांडवीच्या सरपंच सुमनबाई पेंदोर आणि ग्राम अधिकारी रवि

जाधव यांच्या विशेष सहकायानें ग्रामपंचायतीच्या माध्यमातून इमारतीची दुरुस्ती, आकर्षक रंगरंगोटी आणि अद्ययावत विद्युत फिटिंगची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या बैठकीची अडचण दूर करण्यासाठी या ठिकाणी सुसज्ज आणि नवीन फर्निचरसह टेबल-खुच्र्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या नूतनीकरणामुळे मांडवीतील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, ज्ञानाच्या या प्रकाशाने भविष्यातील पिढी घडण्यास मोठी मदत होणार आहे, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे..

# वाचनसंस्कृतीचा दीपस्तंभ

## जागतिक पुस्तक दिन-डॉ.राजेंद्र बगाटे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

२३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पुस्तक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ पुस्तकांचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून तो ज्ञान, विचार, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या जतनाचा व प्रसाराचा उत्सव आहे. मानवी सभ्यतेच्या इतिहासात पुस्तकांनी जे योगदान दिले आहे, ते अनमोल आहे. शब्दांच्या माध्यमातून माणसाने आपल्या अनुभवांना, विचारांना, ज्ञानाला आणि संस्कृतीला आकार दिला आणि ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे पुस्तक हे केवळ अक्षरांचा संच नसून ते मानवी उत्क्रांतीचे आणि सामाजिक प्रगतीचे सशक्त साधन आहे. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला या महत्त्वाची जाणीव करून देणारा आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देणारा एक प्रेरणादायी दिवस आहे.मानवाच्या आरंभीच्या काळात ज्ञानाची देवाणघेवाण तोंडी परंपरेतून होत असे. कथा, लोकपरंपरा, धार्मिक विधी आणि जीवनातील अनुभव यांद्वारे ज्ञान पिढ्यान्पिढ्या पुढे जात होते. परंतु लिपीचा शोध लागल्यानंतर ज्ञानाचे लिखित स्वरूपात जतन होऊ लागले आणि तेच पुढे पुस्तकांच्या स्वरूपात विकसित झाले. भारतीय संस्कृतीमध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, संत साहित्य आणि विविध तत्त्वज्ञानपर ग्रंथांनी ज्ञानपरंपरेचा भक्कम पाया घातला. या ग्रंथांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक विचार नाहीत, तर मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये, सामाजिक संरचना आणि जीवनपद्धती यांचा सखोल अभ्यास आढळतो. त्यामुळे पुस्तक हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक ठरते.वाचन ही एक सवय नसून ती एक संस्कारप्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना मिळते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि विवेकबुद्धी विकसित होते. एखादे पुस्तक वाचताना वाचक त्या लेखकाच्या अनुभवविश्वात प्रवेश करतो आणि विविध भावविश्वांचा अनुभव घेतो. त्यामुळे वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती आत्मविकासाची एक सर्जनशील यात्रा आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि समंजस बनते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा विचारशील व्यक्तींची आवश्यकता असते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचा स्फोट झाला आहे. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे यांमुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे. परंतु या माहितीच्या महासागरात सखोल ज्ञान हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती ही तात्पुरती आणि तुकड्यांमध्ये मिळणारी असते, तर ज्ञान हे सुसंगत, सखोल आणि टिकाऊ असते. पुस्तक वाचनामुळेच हे सखोल ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल माध्यमे ही पूरक साधने असू शकतात, परंतु त्यांची जागा पुस्तक घेऊ शकत नाही.

विद्यार्थी जीवनात वाचनाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित ठेवणे योग्य नाही. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, चरित्रे, विज्ञान, इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील पुस्तके वाचल्यास विद्यार्थ्यांची ज्ञानाची व्याप्ती वाढते. वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपदा वाढते आणि विचार मांडण्याची क्षमता सुधारते. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर वाचनसंस्कृती रुजवणे अत्यंत गरजेचे आहे.



समाजाच्या दृष्टीने पाहिले, तर वाचनसंस्कृती असलेला समाज अधिक प्रगत आणि जागरूक असतो. वाचनामुळे नागरिकांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांविषयी जाणीव निर्माण होते. पुस्तकांच्या माध्यमातूनच अनेक सामाजिक चळवळींना बळ मिळाले आहे. समाजसुधारकांनी आपल्या लेखनातून समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे वाचनसंस्कृती ही लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत आवश्यक आहे.मराठी साहित्य परंपरा अत्यंत समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. त्यांच्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला गेला आणि परिवर्तनाची प्रेरणा दिली गेली. साहित्य हे समाजाचे आरसे आहे, असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे.आजच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, वेळेअभावी वाचनाकडे दुर्लक्ष, पुस्तकांच्या वाढत्या किंमती, तसेच ग्रंथालयांची अपुरी संख्या ही काही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः लहान मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत चालल्याचे दिसते. त्यामुळे बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुस्तकांची ओळख करून द्यावी आणि त्यांच्यासोबत वाचनाचा आनंद घ्यावा.ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची केंद्रे आहेत. ग्रामीण भागात ग्रंथालयांची संख्या वाढवणे आणि त्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी वाचनालये उभारून वाचनसंस्कृतीला चालना देता येऊ शकते. तसेच, पुस्तक प्रदर्शन, वाचन स्पर्धा, लेखक-वाचक संवाद, कथाकथन कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे वाचनाची आवड वाढवता येते.'जागतिक पुस्तक दिन' साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे वाचनसंस्कृतीला चालना देणे आणि लेखकांच्या योगदानाचा गौरव करणे हा आहे. या दिवशी विविध ठिकाणी पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक कार्यक्रम, चर्चासत्रे आणि व्याख्याने आयोजित केली जातात. यामुळे लोकांमध्ये पुस्तकांविषयी जागरूकता निर्माण होते.तंत्रज्ञानाच्या युगात ई-पुस्तके आणि ऑडिओ पुस्तके यांचा वापर वाढत आहे. ही साधने वाचनासाठी उपयुक्त ठरत असली, तरी पारंपरिक पुस्तकांचे महत्त्व अजूनही कायम आहे. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाही पारंपरिक वाचनसंस्कृती जपणे आवश्यक आहे.वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासन यांनी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. 'दर महिन्याला एक पुस्तक' अशी संकल्पना राबवता येईल.शेवटी असे म्हणता येईल की, पुस्तक हे मानवाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. ज्ञान, संस्कार आणि विचार यांचे संगम म्हणजे पुस्तक. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला वाचनाची प्रेरणा देणारा दिवस आहे. आजच्या युगात सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासून ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीत आपला वाटा उचलावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.

## गाण्यावर बंदी नाही, तर गुन्हा नोंद कसा?

### हिडमा गाण्यावर नृत्य,करणाऱ्या विद्यार्थ्यावर गुन्हे प्रकरणी आजाद समाज पार्टी तर्फे निवेदन

# गडचिरोलीतील विद्यार्थ्यांवर पुण्यात लावलेले गुन्हे तात्काळ रद्द करा अन्यथा आंदोलन करणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेवा पवार । गडचिरोली**

विश्रांतवाडी येथील समाजकल्याण वस्तीगृहात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात आदिवासी संस्कृतीचे सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करणे ही अत्यंत अन्यायकारक, असंवेदनशील आणि दडपशाहीची कारवाई आहे, असा तीव्र निषेध आजाद समाज पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात येत आहे. विशेष बाब म्हणजे ही मुले गडचिरोली जिल्ह्यातील रहिवासी असून सध्या पुण्यात ते समाजकल्याण वसतिगृहात उच्च शिक्षण घेण्यासाठी राहत असल्याची माहिती आहे.

सदर कार्यक्रमात हिडमा या गाण्यावर नृत्य सादर केल्यामुळे गडचिरोली येथील किरण गोमासे व श्रीनिवास कुमरी या दोन निष्पाप विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे विद्यार्थी शिक्षण घेणारे असून त्यांचा कोणत्याही प्रकारच्या नक्षलवादी विचारसरणीशी संबंध नाही. केवळ आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन केल्याबद्दल त्यांना गुन्हेगार ठरवणे हे संविधानिक मूल्यांना हरताळ फासणारे आहे.शासनाने पाहिजे तर गाण्यावर बंदी घालायला पाहिजे. धेंर्ल्लिश वर हे गाणे सहज उपलब्ध असून शासनाने गाणे निर्माण करणाऱ्यावर, स्टुडिओ वर आणि नेट वर उपलब्ध करणाऱ्यावर अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. जर संबंधित गाण्यावर कोणतीही अधिकृत बंदी नाही, तर त्या गाण्यावर नृत्य केल्याबद्दल विद्यार्थ्यांवर कारवाई करणे हे कायद्याचा चुकीचा वापर आहे, तर्कसंगत व न्यायसंगत नाही. ही कारवाई विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला घालणारी असून त्यांच्या शैक्षणिक आणि मानसिक आयुष्यावर गंभीर परिणाम करणारी आहे.

आजाद समाज पक्ष प्रशासनाला स्पष्ट इशारा देत आहे की, या प्रकरणाची तात्काळ आणि निष्पक्ष चौकशी करून संबंधित विद्यार्थ्यांवर दाखल केलेला गुन्हा त्वरित मागे घ्यावा. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी.

**न्याय, समता आणि संविधानिक अधिकारांचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही.**

**राज बन्सोड, जिल्हाध्यक्ष. आजाद समाज पक्ष गडचिरोली**




### शिरूर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी; अवैध धंद्यांवर करडी नजर,कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त

# पोलीस निरीक्षक संदेश केजळे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हेगारीवर आळा; शेकडो आरोपींवर कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । फिरोज सिकलकर**

शिरूर पोलीस ठाण्याने सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीत उल्लेखनीय व धडाकेबाज कामगिरी करत विविध अवैध धंद्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. पोलीस निरीक्षक संदेश केजळे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेत शिरूर परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत.

अवैध शस्त्रांविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत सुमारे १६ गावठी पिस्तुले व २३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून २३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी सखोल तपास व शोधमोहीम अद्याप सुरू आहे.

तसेच अवैध दारू विक्री, वाहतूक व गावठी दारू निर्मितीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत १३४ गुन्हे दाखल केले असून १२० आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत सुमारे ७८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये देशी-विदेशी दारू व निर्मितीसाठी लागणारे साहित्य यांचा समावेश आहे.

अमली पदार्थांविरोधातील कारवाईत गांजाच्या ८ गुन्ह्यांमध्ये १३ आरोपींवर कारवाई करत सुमारे ३,१४० किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध गुटखा विक्रीच्या ८ प्रकरणांत २२ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ९ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे एमडी ड्रग्स प्रकरणात सुमारे २९ कोटी रुपयांचा अमली पदार्थ जप्त करून १० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

संघटित गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी किरकोळ संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाई करत वारंवार गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर कठोर पावले उचलण्यात आली आहेत. तसेच सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए कायद्यानुसार अटक, तडीपार व टोळ्या हद्दपार करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही पोलिसांनी कडक कारवाई करत ब्लॅक फिल्म, फॅन्सी नंबर प्लेट, विना नंबर प्लेट वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे. बुलेट सायलेन्सरविरोधात विशेष मोहीम राबवून ६८ वाहनांवर दंड ठोठावण्यात आला असून ३५ सायलेन्सर नष्ट करण्यात आले आहेत. एकूण १०,९८९ वाहनांवर कारवाई करून १ कोटी १८ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

एकूणच विविध प्रकारच्या कारवाईतून सुमारे १९ कोटी ४५ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही सर्व कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील काळातही गुन्हेगारीविरोधात अशीच कठोर मोहीम सुरू ठेवली जाणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# PM आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित

### दिग्रस नगर परिषदेला पाठपुराव्यात अपयश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किशोर की. कांबळे । दिग्रस**

शहरातील प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत निवड झालेल्या अनेक लाभार्थ्यांचे अनुदान अद्यापही प्रलंबित असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मंजूर झालेले अनुदान वेळेत न मिळाल्याने अनेक कुटुंबांची आर्थिक अडचण वाढली आहे.

लाभार्थ्यांच्या मते, आवश्यक कागदपत्रे सादर करूनही अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा होत नाही. यासाठी वारंवार दिग्रस नगर परिषद कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असूनही ठोस तोडगा निघत नाही. काही लाभार्थ्यांनी बांधकाम सुरू केले असले तरी निधीअभावी काम अर्धवट अवस्थेत थांबले आहे.नगर परिषद प्रशासनाकडून शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात अपयश येत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. वेळेत अनुदान न मिळाल्यास बांधकाम खर्च वाढत असून, कर्जाचा बोजा देखील वाढत असल्याने लाभार्थ्यांची परिस्थिती अधिकच बिकट होत आहे.

लवकरात लवकर प्रलंबित अनुदान वितरित करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून जोर धरत आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गोकुंदा येथील सु-संस्कार निवासी मतीमंद विद्यालयात विधी सेवा समितीचे कायदेविषयक शिबिर उत्साहात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

तालुका विधी सेवा समिती, किनवटच्या वतीने गोकुंदा (ता. किनवट) येथील सु-संस्कार निवासी मतिमंद विद्यालयात नुकतेच कायदेविषयक जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरातून विद्यार्थी व पालकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने हे होते. यावेळी वकील संघाचे उपाध्यक्ष टी. आर. चव्हाण यांच्यासह सदस्य डी. जी. काळे, पी. पी. गावंडे, विलास शामीले, दिपा सोनकांबळे, पी. जी. घुले आणि बी. बी. कानींदे (सर्व वकील)उपस्थित होते.




शिबिरात अँड. दिपा सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना विविध कायदे, हक्क आणि शासकीय सुविधा याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांचे हक्क, शिक्षण व संरक्षण यावर त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले, तर उपस्थित पालकांसाठी मिष्ठान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. वायकुळे यांच्यासह श्री . शिंदे , श्री.डहाके , श्री .अस्वले यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांना शिक्षकेत्तर कर्मचारी श्रीमती जाधव, श्री. मनोहरे, श्री. ढगे, श्री. आईटवार, श्री. अमृते, श्री. बिरादार, श्री. कदम आणि श्री. पांढरे यांनीही सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. तोडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक श्री. वायकुळे यांनी मानले.

### पनवेल तालुक्यात मनसेच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

# नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष श्री राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच रायगड जिल्हा संपर्क अध्यक्ष संदिप देशपांडे व योगेश परुळेकर यांच्या मार्गदर्शना नुसार संदेश भाई ठाकूर रायगड जिल्हा अध्यक्ष व सुजित सोनवणे पनवेल तालुका अध्यक्ष, अल्पेश कडु तसेच राहुल पाटील यांच्या उपस्थितीत पनवेल तालुक्यात नविन पदनियुक्त्या करण्यात आल्या. निर्दोष केशव गोंधळी पनवेल तालुका सचिव, आकाश श्रीकांत देशमुख उलवे शहर अध्यक्ष, तुषार सुनील म्हात्रे गव्हाण विभाग अध्यक्ष , अमित



विनायक पाटील उलवे शहर उपाध्यक्ष, राजेश शंकर परमेश्वर उलवे शहर सचिव , नितिन कीसन तळेकर उलवे शहर सचिव, बाळकृष्ण जगन्नाथ पाटील गव्हाण विभाग उपाध्यक्ष तसेच प्रितम पंढरीनाथ तांडेल गव्हाण विभाग उपाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बालकामगार निर्मूलनासाठी नांदेड जिल्ह्यातून ठाम पाऊल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्हा बालकामगारमुक्त करण्यासाठी नागरी समाज, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्व नागरिकांनी एकत्र यावे, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त आशिष सुरेखा दिलीप ढवळे यांनी केले आहे.बालपण म्हणजे शिक्षण, खेळ आणि उज्ज्वल भविष्यासाठीची तयारी. मात्र आजही अनेक मुले हॉटेल, गॅरेज, बांधकाम साईट, दुकाने आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली दिसतात. ही परिस्थिती समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

बालकामगार ही केवळ आर्थिक समस्या नसून ती एक गंभीर सामाजिक अन्यायाची बाब आहे. गरिबी, पालकांचे अशिक्षण, स्थलांतर आणि स्वस्त मजुरीची मागणी ही यामागील प्रमुख कारणे आहेत. काही नियोक्ते कमी मजुरीत जास्त काम करून घेण्यासाठी मुलांचा गैरफायदा घेतात, जे कायद्याने दंडनीय आहे.भारत सरकारच्या बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ नुसार १४ वर्षांखालील मुलांना कोणत्याही कामावर ठेवण्यास बंदी आहे. तसेच १४ ते १८ वयोगटातील मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास सक्त मनाई आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाते.

नांदेड जिल्ह्यात कामगार विभाग, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांतून बालकामगार विरोधी मोहिमा राबविण्यात येत आहेत. यामध्ये छापे, जनजागृती अभियान आणि बालकांचे पुनर्वसन यावर विशेष भर दिला जात आहे.

बालकामगार निर्मूलन ही केवळ शासनाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सजग नागरिक म्हणून आपण पुढीलप्रमाणे सहकार्य करावे:




* १४ वर्षाखालील बालक काम करताना किंवा १४ ते १८ वयोगटातील बालक धोकादायक कामात गुंतलेले आढळल्यास त्वरित कळवा
* चाइल्ड हेल्पलाइन: १०९८
* सहायक कामगार आयुक्त कार्यालय, उद्योग भवन, शिवाजी नगर, नांदेड येथे तक्रार नोंदवा
* आपल्या परिसरातील बालकामगार ठेवणाऱ्या आस्थापनांना विरोध करा
* पालकांना मुलांना शाळेत पाठवण्यासाठी प्रोत्साहित करा

लहान हातात काम नाही, शिक्षणाचीच ओळख पाहिजे.

# बैलांची मागणी वाढली; ट्रॅक्टर खर्चामुळे शेतकरी बैलाकडे वळल

# देगलूर भागातील चित्र; यांत्रिकीकरणातही बैलांची महत्त्व कायम,बैल जोडी किमतीतही झाली मोठी वाढ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

शेतीत यांत्रिकीकरण वाढल्यामुळे काही काळ बैलांचे महत्त्व कमी झाले होते. अनेक शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची मशागत करू लागले होते. मात्र सध्या ट्रॅक्टरचे वाढते भाडे आणि इंधन खर्च परवडेनासा झाल्याने शेतकरी पुन्हा पारंपरिक शेतीकडे वळताना दिसत आहेत. त्यामुळे बैलांची मागणी अचानक वाढली असून देगलूर येथील आठवडी बाजारात बैलांच्या किमतीत मोठी वाढ झाल्याचे चित्र आहे.

देगलूर हे शहर महाराष्ट्र ,कर्नाटक, तेलंगणा या तीन राज्याच्या सीमेवर वसलेले असल्यामुळे येथे दर शनिवारी भरणारा आठवडी बाजार भरतो या बाजारामध्ये सर्व राज्यांमधून व तालुक्यातील



शेतकरी येथे बैल खरेदी व विक्रीसाठी येताना दिसून येत आहेत. यामुळे बैलांची मागणी अचानक वाढली असून देगलूर येथील आठवडी बाजारात बैलांच्या किमतीत मोठी वाढ झाल्याचे चित्र आहे.

देगलूर येथे दर शनिवारी भरणारा आठवडी बाजार या तालुक्यातील व परिसरातील प्रमुख बाजारपेठ मानला जातो. या बाजारात मोठ्या प्रमाणात पशुधनाची खरेदी विक्री होत असते.

विशेषतः बैल बाजार साठी हा परिसर प्रसिद्ध आहे. गेल्या महिन्याभरात बैलांच्या मागणीत लक्षणीय वाढ झाल्यामुळे त्यांच्या किमती वगनाला भिडल्या आहेत.

**किंमत सतत वाढतेय; शेती कशी करावी ?**

अरे शेतकरी कर्ज काढून किंवा बचत खर्च करून पशुधन खरेदी करत आहेत. काहींना मात्र वाढलेल्या घरामुळे बैल खरेदी करणे कठीण जात असून औत मोडण्याची वेळ येत आहे.

**पाडव्यानंतर शेती कामास सुरुवात**

पाडवा सणा नंतर मराठी नवीन वर्षाची सुरुवात होताच शेतीच्या कामांना वेळ येतो. या काळात शेतकरी नव्या हंगामासाठी मशागतीची तयारी सुरू करतात. गतवर्षीचे बैल बदलणे, यासारखी कामे मोठ्या प्रमाणात केली जातात.

**लाख रुपये पर्यंत बैलांची किंमत**

सध्या शेतीच्या मशागतीचा हंगाम सुरू झाला असून, शेतकऱ्यांना बैलाची मोठ्या प्रमाणावर गरज भासत आहे. परिणामी चांगल्या प्रतीच्या बैल जोडीसाठी दीड लाख ते दोन लाख रुपये मोजावे लागत आहेत. सर्वसाधारणबैलही जोडीसाठी ही सुमारे एक लाख रुपये पर्यंत किंमत पोहोचली आहे.

या वाढत्या दरामुळे सामान्य शेतकऱ्यासमोर मोठे आर्थिक आव्हान उभे टाकले आहे. एकूणच ट्रॅक्टरच्या वाढत्या दरामुळे व खर्चामुळे पारंपरिक शेती पद्धतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यामुळे बैलांना पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता–अनिता खरात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर,पुणे । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप करत तेजस्वी फाउंडेशन ग्रुपच्या वतीने गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

ग्रुपच्या संस्थापक–अध्यक्षा अनिता खरात यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,आरटीई प्रवेश प्रक्रियेत गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वंचित ठेवले जात असून काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने प्रवेश दिले जात आहेत. शाळेपासून निश्चित अंतराच्या निकषांमध्ये फेरफार करून अपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

तसेच काही ठिकाणी दलालांकडून पैसे घेऊन प्रवेश मिळवून दिल्याचे प्रकार समोर येत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.यामुळे मुख्य पात्र विद्यार्थ्यांना न्याय मिळत नसल्याची भावना पालकांमध्ये निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी



करून दोषींवर कडक कारवाई करावी,तसेच पारदर्शक पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवावी,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.दरम्यान,या विषयावर लवकरात लवकर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा देखील तेजस्वी फाउंडेशनच्या वतीने देण्यात आला आहे.

## कोरोना काळातील 'त्या' निस्वार्थी सेवेचा अंत; विकी पाटील यांच्या निधनाने गाव पोरके;रुग्णवाहिका सेवेतून शेकडो जीव वाचवणारा 'दाता' अनंतात विलीन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

आपल्या रुग्णवाहिका सेवेच्या माध्यमातून शेकडो रुग्णांचे प्राण वाचवणारे आणि सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे वाटेगाव येथील तरुण कार्यकर्ते *विकी पाटील वाटेगावकर* यांचे २१ एप्रिल २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने वाटेगावसह परिसरात शोककळा पसरली आहे.

विकी पाटील हे केवळ एक नाव नसून संकटात धावून जाणारा एक आधार होते. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात, जेव्हा सर्वत्र भीतीचे वातावरण होते, तेव्हा त्यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता अहोरात्र रुग्णवाहिका चालवून अनेकांना वेळेत उपचार



मिळवून दिले. त्यांच्या या निस्वार्थी सेवेमुळे त्यांनी जनसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते.

त्यांच्या पश्चात मोठा मित्रपरिवार आणि कुटुंब असून, त्यांच्या जाण्याने समाजातील एक माणुसकी जपणारे व्यक्तिमत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांचा *अंत्यविधी आज, दि. २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता वाटेगाव येथे* पार पडणार आहे.

पर्याय २: सोशल मीडियासाठी

भावपूर्ण श्रद्धांजली ।।

एक धडपड्या तरुण, रुग्णवाहिका सेवेच्या माध्यमातून अनेकांचा जीव वाचवणारा 'वाटेगावचा आधारस्तंभ' विकी पाटील वाटेगावकर यांचे दुःखद निधन झाले.

संकटकाळात मदतीचा हात देणारा आणि प्रत्येकाच्या सुख–दुःखात खंबीरपणे उभा राहणारा एक सच्चा मित्र आज आपल्यातून निघून गेला. कोरोनाच्या भीषण काळात त्यांनी दिलेली सेवा समाज कधीच विसरू शकणार नाही.

अंत्यविधी:* बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६

वेळ: सकाळी ९:०० वाजता

स्थळ: वाटेगाव

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या परिवारास हे दुःख सावरण्याची शक्ती देवो.

भावपूर्ण श्रद्धांजली! =

पर्याय ३: श्रद्धांजली संदेश

माणुसकीचा झरा आटला...

आपल्या निस्वार्थी रुग्णवाहिका सेवेने अनेकांचे प्राण वाचवणारे वाटेगावचे लाडके *विकी पाटील* यांना भावपूर्ण श्रद्धांजली. विकी, तुझे जाणे मनाला चटका लावून जाणारे आहे. तुझ्या रूपाने गावाने एक हिरा गमावला आहे. भावपूर्ण श्रद्धांजली!

## धारूर शहरात गॅस साठी भर उन्हात रांगा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किल्ले धारूर । मुंडे के. डी.**

धारूर शहरात भर उन्हात गॅस मिळण्यासाठी रांगा लागल्याचे दिसून येत आहे. यामुळे सर्वसामान्यांना गॅस मिळवण्यासाठी रांगेत थांबावे लागत आहे सर्व कामे सोडून या रांगेत थांबावे लागत आहे. यातून सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की धारूर शहरांमध्ये घरगुती गॅस मिळवण्यासाठी भल्या मोठ्या रांगा करावे लागत आहेत दोन ते तीन तास गॅस साठी नंबर येत नसल्याने सर्वसामान्य नागरिक परेशान झाले आहेत गॅस गरजेची गोष्ट आहे. गॅस नसेल तर स्वयंपाक कसा करावा ही

अशी मोठी अडचण गृहिणींना भेडसावत आहे



गॅस आणण्यासाठी गेल्यास गॅस साठी रंगाच रांगा दिसत आहेत. प्रशासन एका बाजूला गॅसची कमतरता नाही गॅस मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याचा डांगोरा करत आहे परंतु खरे वास्तव मात्र वेगळेच आहे. गॅस

हा मिळत नसल्याने नागरिकांना रांगा लावाव्या लागत आहेत यातून गोरगरीब सर्वसामान्य नागरिक रोजंदारीने त्यांना कामाला जावे लागते परंतु गॅस आणण्यासाठी गेल्याने दोन ते तीन तास रांगेमध्ये थांबावे लागत आहे यामुळे त्यांचा रोजगार बुडत असून यामुळे जनजीवन पूर्णतः

विस्कळीत झाले आहे याबाबत प्रशासनाने जागरूकता दाखवत घरपोच गॅस कसा मिळेल या सुविधेकडे लक्ष द्यायला हवे, धारूर तहसील पुरवठा विभाग मात्र मूग गिळून गप्प असल्याचे दिसून येत आहे यावर प्रशासनाने तोडगा काढणे गरजेचे आहे

## गुरुद्वारा परिसरात १७ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

नांदेड शहरातील गुरुद्वारा परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने २१ एप्रिल २०२६ रोजी नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण १७ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही केली. या कार्यवाहीत ८ हजार ३०० रुपये दंड वसूल केला. सदर कार्यवाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.राजाभाऊ बुट्टे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ. संजीवनी जाधव, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते




बालाजी गायकवाड, केस रजिस्ट्री सहाय्यक सुनील तोटेवाड व एमजीवीएसचे मंगेश गायकवाड तसेच वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्सटेबल ज्ञानेश्वर पांचाळ उपस्थित होते.

सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.


## घरकुल धारकांना शासनाने जाहीर केलेली ५ ब्रास मोफत रेती तात्काळ द्यावी

### रंजित तुपसमुंद्रे यांची मागणी तहसीलदार यांना निवेदन सादर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । रमेश मुलगीर**

घरकुल धारकांना शासनाने जाहीर केल्या प्रमाणे ५ ब्रास मोफत रेती तात्काळ उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रंजित तुपसमुंद्रे यांनी मानवत तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांच्याकडे निवेदना द्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. घरकुल लाभार्थ्यांना शासनाकडून अनुदान मिळते. परंतु अनुदानातुन घरकुल बांधकाम पूर्ण करणे शक्य नसल्याने व रेतीचे भाव गगनाला भिडलेले यामुळे अनेक घरकुल लाभार्थ्यांचे बांधकाम रखडले ही बाब लक्षात घेता शासनाने लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास रेती उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला परंतु मानवत तालुक्यात आणखी महसूल प्रसासना कडून अंमलबजावणी झालेली दिसत नाही त्यामुळे अनेक घरकुल लाभा र्थ्यांचे बांधकाम रखडले आहेत. त्यामुळे शासनाने तात्काळ घरकुल लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास रेती उपलब्ध करून द्यावी सदरील निर्णयाची



अंमलबाजवणी करावी अन्यथा १५ मे रोजी पासून मानवत तहसील कार्यालया समोर एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात येईल व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्या सर्वस्व जबाबदारी प्रसासनाची राहील असा इशारा ही निवेदनाद्वारे रंजित तुपसमुंद्रे यांनी दिला आहे.

## जिवती तालुक्यात ग्रामपंचायतीचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात!

## दमपूर मोहदा येथे सरपंच–ग्रामसेवकांवर गंभीर आरोप; ग्रामसभा बंद, विकासकामांवर प्रश्नचिन्ह

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे**

जिवती तालुक्यातील दमपूर मोहदा ग्रामपंचायतीचा कारभार सध्या गंभीर वादाच्या भोवऱ्यात सापडला असून, सरपंच व ग्रामसेवक यांच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विविध अनियमितता, गैरव्यवहार आणि मनमानी कारभारामुळे संपूर्ण ग्रामपंचायत प्रशासनावर संशय निर्माण झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गावात ग्रामसभा नियमित घेतली जात नसून नागरिकांचा सहभाग पूर्णपणे डावलला जात आहे. ग्रामसभेशिवायच अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असल्याने गावाच्या विकास प्रक्रियेला धक्का बसत आहे. विशेष म्हणजे, वार्षिक विकास आराखडाही ग्रामसेवकांनी




स्वतः तयार करून मंजूर केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

याशिवाय, मासिक बैठकीसाठी आवश्यक असलेल्या नोटिसा अनेक सदस्यांना दिल्या जात नसल्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बैठकीत विषयांचे वाचन न करता थेट निर्णय घेतले जात असल्याने लोकशाही प्रक्रियेचा पूर्णपणे अवमान होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यास त्यांच्याशी उद्धट व अपमानास्पद वर्तन केले जात असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. विशेषतः महिला सदस्यांचा अपमान झाल्याच्या घटनांमुळे गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच सरपंच बैठकीस अनुपस्थित राहत असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे.

विकासकामांमध्येही अनियमितता उघड झाली आहे. दलित वस्तीसाठी मंजूर असलेला ठज प्लांट इतर ठिकाणी बसवण्यात आल्याने सामाजिक अन्यायाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. तसेच निधीचा गैरवापर आणि ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीचे काम मागील चार वर्षांपासून अपूर्ण राहिल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या सर्व प्रकारांमुळे ग्रामपंचायतीचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालत असल्याची भावना निर्माण झाली असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व संबंधित सरपंचांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आह

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933